आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र– दु ३.०० वाजता

८ जून २०२३ – गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचं द्वैमासिक धोरण जाहीर / रेपोदरात कुठलाही बदल न करण्याचा निर्णय

- राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 44 च्या उधमपूर - रामबाण विभागातला जैसवाल पूल पूर्ण झाला असल्याची, केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची माहिती

- सर्व शासकिय वसतिगृहांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना/ अहवाल १४ जूनपर्यंत शासनाला सादर करण्याचे समितीला निर्देश

- मुंबई आग्रा रोडवर आज पहाटे कंटेंनरनं दिलेल्या धडकेत दोन जैन साध्वी ठार

**आणि**

- नैऋत्य मोसमी पाऊस केरळात दाखल

**<><><><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेनं चालू आर्थिक वर्षातील द्वैमासिक पतधोरण आज जाहीर केलं. अपेक्षेप्रमाणे बॅंकेने व्याज दरात कुठलाही बदल केला नाही

धोरण आढाव्याची घोषणा करताना, RBI गव्हर्नर शक्तीकांत दास म्हणाले की, चलनविषयक धोरण समितीने पॉलिसी रेपो दर 6 पूर्णांक 5 दशांश टक्के अपरिवर्तित ठेवण्याचा निर्णय घेतला तर स्थायी ठेव सुविधा अर्थात SDF दर 6 पूर्णांक 25 शतांश टक्के कायम ठेवला. पुर्वीच्या 6 पूर्णांक 75 शतांश टक्यांचा सीमांत स्थायी सुविधा आणि बँक दरात कोणताही बदल करण्यात आला नाही.

एमपीसीच्या सहा सदस्यांपैकी पाच सदस्यांनी बहुमताने हा निर्णय घेतला की वाढीला पाठिंबा देताना महागाईवर लक्ष केंद्रित  करून ती बरोबरीने ठेवली जाईल. RBI गव्हर्नर म्हणाले की, मार्च-एप्रिल 2023 दरम्यान भारतातील ग्राहक किंमत महागाई कमी होऊन ती ६ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांपर्यंत खाली आली.

तथापि, ताज्या आकडेवारीनुसार मुख्य चलनवाढ अजूनही ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा  जास्त आहे आणि 2023-24 च्या आमच्या अंदाजानुसार या चलनवाढीत कुठलाही बदल होणार नाही. ते म्हणाले की आमच्या मूल्यांकनानुसार 2023-24 मध्ये महागाई 4 टक्कयांच्या वर राहील. शक्तीकांत दास म्हणाले की, सर्व घटकांचा विचार करून आणि सामान्य मान्सून गृहीत धरल्यास, CPI चलनवाढ 2023-24 साठी 5 पूर्णांक 1दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे.

त्यांनी दोन हजारांच्या नोटा बँकेतून काढण्याबाबत सांगितलं की,  मे च्या तिसऱ्या आठवड्यापासून चलनातील घट आणि सरकारी खर्चात वाढ यामुळे प्रणालीतील तरलता वाढली आहे. आरबीआयचे बाजार कामकाज आणि बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर दोन हजार रुपयांच्या नोटा जमा झाल्यामुळे या तरलतेत आणखी वाढ झाली आहे.

इंडियन र्मचट चेंबर चे अध्यक्ष अनंत सिंघानिया यांनी द्वैमासिक आर्थिक धोरणावर प्रतिक्रिया देतांना सांगितलं की बहुपक्षीय संस्थांची लवचिक भारतीय अर्थव्यवस्थेला मान्यता होती. ते पुढे म्हणाले की २०२३ च्या चौथ्या तिमाहीत जीडीपीची वाढ अपेक्षेपेक्षा जास्त,  सकल कर संकलन उत्साहवर्धक आणि कॅपेक्सवर जोर होता. चलनवाढ कमी होणं, परकीय चलनाचा ओघ आणि ग्रामीण भागात मागणी वाढल्यामुळे अपेक्षित वृध्दी झाली असल्याचं, तसचं आजचं आर्थिक धोरण आढावा अपेक्षेप्रमाणे असल्याचं सिंघानिया यांनी सांगितलं.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र– दु ३.०० वाजता

८  जून  २०२३ – गुरुवार

<><><><><><>

महाराष्ट्र ही संतांची, थोरपुरुषांची आणि समाजसुधारकांची भूमी आहे.या भूमीत जन्माला आलेले बाळासाहेब दौलतराव देसाई यांचं कार्य अलौकिक आहे. त्यांनी महाराष्ट्राला दिशा दिली. त्यांनी सर्व सामान्य जनतेसाठी केलेलं कार्य कायमच आठवणीत राहील, असे गौरवोद्गार राज्यपाल रमेश बैस यांनी काढले.

राजभवनातील दरबार हॉलमध्ये आज संध्याकाळी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे लिखित महाराष्ट्राचे पोलादी पुरुष लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जीवनकार्यावर आधारित 'दौलत : दौलतराव श्रीपतराव देसाई' या चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा राज्यपाल रमैश बैस यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला. त्यावेळी राज्यपाल  बोलत होते.

<><><><><><>

जम्मू- काश्मिर इथल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 44 च्या उधमपूर - रामबाण विभागातल्या चेनाब नदीवरील 2 मार्गिका असणारा जैसवाल पूल पूर्ण झाला असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या ट्वीटच्या माध्यामातून दिली. 118 मीटर लांब असणारा हा पूल वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असल्याचं त्यांनी आपल्या ट्वीट मध्ये म्हटलं आहे. या पूलाच्या बांधकामासाठी 20 कोटींचा खर्च आल्याचं त्यांनी  सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील केंद्र सरकार जम्मू - काश्मिरच्या रस्ते आणि महामार्ग विकासासाठी वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. जम्मू - काश्मिरच्या पायाभूत सुविधांमुळे केवळ आर्थिक विकासच नाही, तर पर्यटनाला देखील चालना मिळेल असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

<><><><><><>

गेल्या महिन्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाली. आकाशवाणी वृत्त विभागाद्वारे केंद्र शासनानं राबवलेल्या उपक्रमांवर विशेष बातम्यांची मालिका घेऊन येत आहे. आज आपण अवकाश क्षेत्रामध्ये त्यांनी केलेल्या कामाबद्दल जाणून घेऊया.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अंतराळ क्षेत्र खाजगी सहभागासाठी खुलं केल्यानंतर तीन वर्षांमध्येच १०५ पेक्षा जास्त स्टार्टअप सुरु झाले. मॉर्स ऑर्बिटर मिशन म्हणजेच मंगळयान मंगळाच्या कक्षेत यशस्वीरित्या समाविष्ट झाल्यानंतर ईस्त्रोनं २८ ऑक्टोबर २०१४ ला मंगळावर दुसरी मोहिम राबवण्याचं जाहीर केलं. त्यानंतर शासनानं २०१७ च्या अर्थसंकल्पात मंगळयान- २ प्रकल्पाला निधी दिला होता. विक्रम साराभाई स्पेस सेंटरचे माजी संचालक डॉ. के. सिवन यांनी सांगितलं की मंगळयान 2 हे केवळ एक ऑर्बिटर मिशन असेल, असं सांगितलं. या मिशनमध्ये मंगळाचे प्रारंभिक टप्पे, त्याचे प्रारंभिक कवच, अलीकडील बेसाल्ट आणि बोल्डर फॉल्स सारख्या चालू कार्यपद्धतींना चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी अतिशय उच्च रिझोल्यूशनचा पंचक्रोमॅटिक कॅमेरा आणि रडारचा यामध्ये समावेश असेल. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची ही मोहिम २०२४ पर्यंत सुरू करण्याची योजना आहे.

<><><><><><><>

प्रसार भारतीच्या वतीनं आकाशवाणी मुंबई केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाअंतर्गत मुंबई, रत्नागिरी, परभणी, नांदेड, लातूर, बीड आणि सांगली या जिल्ह्यांसाठी कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्तीसाठी अर्ज मागवले आहेत. २४ ते ४५ वयोगटातले पात्र उमेदवार यासाठी आपले अर्ज सादर करू शकतील. यासाठीची पात्रता, अर्जाचा नमुना तसंच इतर माहिती प्रसार भारती डॉट जीओव्ही

डॉट इन स्लॅश पी बी व्हॅकेन्सिंज या दुव्यावर उपलब्ध आहे.  इच्छुकांना एअर न्यूज पॅनल ट्वेंटी ट्वेंटी टू ॲट जीमेल डॉट कॉम या ईमेल आयडीवर आपले अर्ज पाठवता येतील.

<><><><><><>

दिवा शहरात 610 कोटींच्या विविध विकास कामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते आज पार पडला. दिवामध्ये स्वतंत्र पोलिस ठाण्याच्या इमारतीसाठी ५ कोटी रूपये देणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. ठाणे महानगरपालिकेच्या वतीनं दिवा शहरात समूह विकास योजना राबवण्यात येत असून त्याबाबतची प्रक्रिया राबवण्याचे निर्देशही त्यांनी महापालिका आयुक्तांना दिले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्यासह नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

<><><><><><>

दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या पहिल्या इंग्रजी भाषेतल्या वृत्तनिवेदक गीतांजली अय्यर यांच्या निधनाबद्दल माहिती प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकुर यांनी शोक व्यक्त केला आहे. अय्यर यांनी बातम्यांमध्ये विश्वासार्हता सोबतच एका विशिष्ट आवाजानं पत्रकारीता आणि प्रसारण जगतात एक विशिष्ट ओळख बनवली होती असं मंत्री ठाकूर यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. अय्यर यांचं काल नवी दिल्लीत निधन झालं, त्या ७६ वर्षांच्या होत्या.

<><><><><><>

डॉ. संजय मुखर्जी यांनी  मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाला भेट देऊन मान्सून पूर्व पाहणीचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त आढावा घेतला. त्यांनी

प्रकल्पाचे सर्व पैलू समजून घेऊन प्रकल्पातील सुधारणांबाबत सर्वसमावेशक चर्चा केली. मान्सूनच्या कालावधीत वातावरणीय बदल, अतिवृष्टी तसंच असमतोल हवामानामुळे समुद्राच्या मध्यभागी प्रगतीचा वेग राखणं कठीण बनतं,  यासाठी महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी कंत्राटदार आणि सल्लागारांना हवामानाच्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्याच्या तसंच त्यानुसार कामाचं नियोजन करून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

<><><><><><><>

नाशिक शहरातील सिडको  इथल्या जैन स्थानकात येत्या दोन जुलै महिन्यापासून सुरू होणाऱ्या चातुर्मास प्रवचनासाठी सिद्धायिका श्रीजी आणि हर्षायिका श्रीजी या मुंबईहून पायी येत होत्या. पहाटे साडेपाचच्या सुमारास कसारा घाटाजवळील एका हॉटेलसमोर त्यांना कंटेनरनं धडक दिली. या दोघींना खर्डी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आलं.  दरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

<><><><><><><>

मानवी अस्तित्वाला आव्हान निर्माण करणाऱ्या ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्यांना सामोरं जाण्यासाठी समाज घटकांनी पुढाकार घेऊन आपले योगदान दिल पाहिजे. एक पेड देश के नाम या सारख्या उपक्रमातील समाजाचा सहभाग पर्यावरणीय समस्यांवर मात करेल असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

जळगावातल्या पर्यावरण संरक्षण समितीनं एक पेड देश के नाम अभियानाची सुरुवात केली आहे.. या  मान्यवरांनी आपल्या मनोगतातून इको ब्रिक्स आणि पर्यावरण संरक्षणाबाबत मार्गदर्शन केलं.

अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी जिल्हाधिकारी अमन मित्तल, जिल्हा उप वनसंरक्षक विवेक होशिंग, आमदार राजूमामा भोळे, अमरभाई कुकरेजा आदी मान्यवर उपस्थित होते.

<><><><><><><>

भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखीचा पहिला रिंगण सोहळा सिन्नर तालुक्यातल्या दातली इथं आज पार पडला. नाशिक जिल्ह्यात झालेला रिंगण सोहळ्यासाठी वारकऱ्यांसह सुमारे ३० ते ३५ हजार भाविक सहभागी झाले.

त्र्यंबकेश्वर इथून निघालेल्या संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचा काल रात्री लोणारवाडी इथं मुक्काम झाला. त्यानंतर आज सकाळी सिन्नर शहरात पायी दिंडी सोहळ्याचे आगमन झाले. दुपारी दातली शिवारात रिंगण सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं.

<><><><><><><>

नागरिकांना सर्व विभागाच्या योजनांची माहिती आणि त्यासाठीचे अर्ज गावातच उपलब्ध व्हावं, तसंच दैनंदिन कामासाठी लागणारे महत्वाचे दाखले, गावातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं शासनानं "शासन आपल्या दारी" हा उपक्रम सुरू केला आहे. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांनी जीवन सुकर करण्यासाठी आवश्यक योजनांसाठी नोंदणी करावी तसंच दाखले उपलब्ध करुन घ्यावेत, असं आवाहन यवतमाळचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केलं.

"शासन आपल्या दारी" उपक्रमांतर्गत आज यवतमाळ तालुक्यातील आकपुरी, आर्णी तालुक्यातल्या लोणबेहळ, कवठा बाजार सुकळी, महागाव

तालुक्यातील मुडाणा, भोसा  गावांमध्ये शिबिर आयोजित करण्यात आलं होते. आकपुरी इथल्या विभागांचा समावेश होता.

<><><><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस दक्षिण अऱबी समुद्राच्या उर्वरित भागात पुढं सरकला असून, संपूर्ण लक्षद्वीप,  तसंच केरळ आणि दक्षिण तामिळनाडूच्या बहुतांश भागात पोचला आहे. सामान्यतः मान्सून केरळमधे १ जूनला पोचतो मात्र यावेळी तो आठवडाभर उशिरानं, आज पोचला असल्याचं हवामान विभागाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

गेल्या चोवीस तासात, केरळमधे बहुतांश भागात पाऊस पडला. येत्या दोन दिवसात मान्सून पुढं सरकत, केरळचा उर्वरित भाग, तामिळनाडू आणि कर्नाटकाच्या काही भागात तसंच नैऋत्येकडच्या आणखी काही भागात पोचेल. त्याचवेळी तो बंगालच्या उपसागराच्या मध्य आणि ईशान्य भागात तसंच ईशान्येकडच्या राज्यांच्या काही भागात पोचेल, असा अंदाज आहे.

<><><><><><><>

कसोटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियानं काल पहिल्या दिवसअखेर तीन बाद ३२७ धावा केल्या. कालचा खेळ थांबला तेव्हा ट्रॅव्हीस हेड १४६ धावांवर, आणि स्टीव्ह स्मीथ ९५ धावांवर खेळत होता. लंडनच्या ओव्हल मैदानावर आज पुढचा खेळ सुरु झाला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ८७ षटकात ३ बाद ३३८  धावा झाल्या होत्या. स्टीव्हन स्मिथनं शतक पूर्ण केलं आहे.

<><><><><><><>

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र– दु ३.०० वाजता

८ जून २०२३ – गुरुवार

दहशतवाद आणि फुटीरतावादाला चालना देण्यासाठी वापरण्यात आलेल्या जम्मु काश्मीर मधल्या ८६ ठिकाणच्या १२४ मालमत्ता जप्त करण्यासाठी एसआयए आणि जम्मू काश्मीर पोलिसांच्या कायदेशीर मोहिमेला आज सुरूवात झाली आहे.

राज्य तपास संस्था अर्थात SIA आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या कार्यकारी गटानं राज्यविरोधी कारवाई संबंधित सरकारच्या शून्य सहिष्णुतेच्या धोरणाशी सुसंगत, दहशतवाद निधीच्या विरोधात कायदेशीर चौकट विस्तृत केली आहे. बेकायदेशीर क्रियाकलाप प्रतिबंध कायदा अर्थात UAPA च्या कलम 8 आणि कलम 25 अंतर्गत SIA ,पोलिस कार्यकारी शाखा आणि संबंधित न्यायालयांनी या कलंकित मालमत्ता जप्त करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरु केली आहे. दहशतवादाविरुद्ध दृढ निश्चय दाखवून, आंतरराष्ट्रीय सनद आणि दहशतवादाविरुद्धच्या अधिवेशनांच्या आवश्यकतेनुसार, दहशतवाद समर्थन प्रणालीचं निर्मूलन करण्यासाठी कायद्याच्या योग्य प्रक्रियेंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><><><>

बायपोरजॉय हे अतीतीव्र चक्रीवादळ गेल्या सहा तासात ताशी सात किलोमीटरच्या वेगानं अरबी समुद्रातून उत्तरेकडे सरकलं. आज दुपारी हे वादळ मुंबईपासून साडे नऊशे किलोमीटर अंतरावर असेल. येत्या 24 तासांपासून तीन दिवसांत हे वादळ वायव्येकडे प्रवास करेल, असं हवामान विभागानं सांगितलं आहे. मासेमारांना 12 तारखेपर्यंत समुद्रात जाण्यास बंदी करण्यात आली आहे. लोकांनाही समुद्र किनारी न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे.

//<><><><><><>//